Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VII ISSUE- I JANUARY 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# सामाजीक शास्त्र विषयाअंतर्गत विद्यार्थ्यांची इतिहास विषयासंबंधीची आवड आणि जागृकता: एक सर्वेक्षण

**डॉ. प्रज्ञा बी. कामडी**
इतिहास विभाग प्रमुख
नगर परिषद शिवाजी महाविद्यालय,
मोवाड – ४४१३०३

*सारांश:*

*प्रभावी शिक्षण हा आजच्या शिक्षण प्रणालीचा मुख्य पाया असलेला दिसुन येतो. इतिहास विषयात भुतकाळातील घटनांचा अभ्यास असतो. त्यात रूची यावी विद्यार्थ्यांना तो समजावा यासाठी अनेक प्रकारच्या शिकविण्याच्या पध्दतीचा अवलंब करणे आज काळाची गरज झालेली आहे. नुसत्या पारंपारीक खडु आणि फळा यावर अवलंबून न राहता इतिहास विषय विद्यार्थ्यांना कसा समजणार, त्याना या विषयात आवड कशी निर्माण होईल या दृष्टीने उपाय करणे आज प्रत्येक शिक्षकाचे प्राथमिक कार्य झाले आहे. प्रस्तुत शोध निबंधात न. प. शिवाजी महाविद्यालय, मोवाड येथिल सामाजीक शास्त्र विषयाअंतर्गत विद्यार्थ्यांची इतिहास विषयासंबंधीची आवड आणि जागृकता याचा अभ्यास केला आहे. डाटा गोळा करण्याकरीता इतिहास विषयाच्या १०० विद्यार्थ्यांना प्रश्नावलीचे वाटप करण्यात आले त्या पैकी ९५ प्रश्नावली रितसर भरून परत आल्या. डाटाचे विश्लेषण करण्याकरीता साध्या टक्केवारी पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे..*

*बिजसंज्ञा: सामाजिक शास्त्र, इतिहास, आवड, जागृकता, शिक्षण प्रणाली.*

## प्रस्तावना:

शिक्षक हा शिक्षण प्रणालीचा मुख्य घटक आहे. आणि प्रभावी शिकविण्याची पध्दत वापरणे हे चांगल्या शिक्षकाचे गुण आहे. इतिहास विशयाचे अध्यापन इतर सामाजीक विषयाच्या तुलनेत थोडे वेगळे आहे. इतर विषयातील बाबी प्रयांगाव्दारे तपासता येते. तसे इतिहास विषयात तपासता येत नाही म्हणेजच इतिहास प्रयोगाव्दारे तपासता येत नाही. इतिहास भुतकाळात घडून गेलेल्या घटनांचा अभ्यास असतो. विद्यार्थ्यांना तो समजावा यासाठी अध्यापनात विशेष परिश्रम घेणे गरजेचे असते. वेगवेगळया शिकविण्याच्या पध्दतीचा वार करून इतिहास विशय शिकविला जाऊ शकतो. बरेचश्या विद्यार्थ्यांना इतिहास विषयात रूची नसलेली आढळून येते किंवा पदवी अभ्याक्रमात ते हा विषय घेण्याचे टाळतात. याचे मुख्य कारण शिक्षकांव्दारे वापण्यात येणारी शिकविण्याची पध्दत असु शकते.

महाविद्यालयात शिकविण्यात येणारा इतिहास विशय खरच विद्यार्थ्यांना आवडतो का, त्यांना या विषायात रूची आहे का, त्यांचे इतिहास विषयाचे ज्ञान कितपत आहे. या सर्व बाबींचा अभ्यास करण्याच्या दृष्टीकोणातून प्रस्तुत सर्वेक्षण केले गेले आहे.

### साहीत्याचा अभ्यास

इतिहास विषयाच्या शिकवणी संदर्भात विदेशात बरेच संशोधन झाल्याचे साहित्याचा अभ्यास करताना दिसून आले. त्यापैकी काही पुढील प्रमाणे

फोगो (२००४) यांनी इतिहास शिकविण्याच्या पध्दतीचे सर्वेक्षण केले त्यांना असे आढळले की बरेचश्या पध्दतीनी इतिहास विषय अधिक प्रभावी पणे शिकविता येते त्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये इतिहास लेखन कला, इतिहास स्त्रोत, ऐतिहासीक वाचन कौशल्य, इतिहास संशोधनात विद्यार्थ्यांचा सहभाग या संबधी रूची निर्माण करणे आवश्यक आहे.

यीलमाझ (२००८) यांनी केलेल्या अभ्यासातून असे सांगीतले आहे की शिक्षकांनी आपल्या ज्ञानात भर पडण्याच्या दृष्टीने संशोधन निबंधाचे वाचन करावे, इतिहास विषयाच्या सेमिनार, चर्चासत्रात सहभागी व्हावे.

कौतुरबा (२०१२) यांनी केलेल्या ग्रीक येथिल शालेय शिक्षकांच्या अभ्यासात असे दिसून आले की, प्रभावी शिकवणी तेव्हाच होवू शकते ज्यात विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष सहभाग असेल. उत्कृष्ठ संप्रेषण तंत्राचा वापर करून विद्यार्थ्यांना इतिहास विषय समजेल यावर भर दिला पाहीजे.

उद्देश

१. विद्यार्थ्यांचे इतिहास विषयासंबंधीचे मते जाणुन घेणे.
२. इतिहास विषय शिकतांना येणाऱ्या त्यांचे अनुभव माहीत करणे.
३. विद्यार्थ्यांना कोणती शिकविण्याची पध्दत विषेश आवडते ते जाणून घेणे.
४. इतिहास विषयातील विद्यार्थ्यांची आवड व जागृकता तपासणे.
५. इतिहास विषयाचे त्यांच्या पुढील शैक्षणिक जिवनातील स्थान याची माहिति घेणे.

संशोधन पध्दती

प्रस्तूत सशोधनात प्रश्नावली तंत्राचा वापर करून डाटा गोळा करण्यात आलेला आहे. एकुण १०० विद्यार्थ्यांना प्रश्नावलीचे वाटप करण्यात आले होते. त्यापैकी ९५ विद्यार्थ्यांनी पश्नावली रितसर भरून दिली. या ९५ विद्यार्थ्यांची नुमना म्हणुन निवड करण्यात आली. डाटाचे विश्लेषण करण्याकरीता साध्या टक्केवारी पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे.

संशोधन मर्यादा

प्रस्तुत संषोधन हे न. प. शिवाजी महाविद्यालय, मोवाड येथिल इतिहास विषयाच्या विद्यार्थ्यांपुरते मर्यादित असुन यात सर्व सेमिस्टरच्या विद्यार्थ्यांचा नमूना निवड करताना विचार करण्यात आलेला आहे.

डाटाचे विश्लेषण

तक्ता क. १:

लिंगपरत्वे सहभागी विद्यार्थी प्रश्नावली प्रतिसाद

| महाविद्यालय | सेमिस्टर | पुरूष | स्त्रिया | एकुण |
|---|---|---|---|---|
| न. प. शिवाजी महा. मोवाड | बी.ए. सेमि. १ आणि २ | १२ (४४.४४ टक्के) | १५ (५५.५५ टक्के ) | २७ (२८. ४२ टक्के ) |
| | बी.ए. सेमि. ३ आणि ४ | १४ (३८.८८ टक्के) | १७ (४७.२२ टक्के ) | ३१(३२. ६३ टक्के ) |
| | बी.ए. सेमि. ५ आणि ६ | १७ (४५.९४ टक्के) | २० (५४.०५ टक्के ) | ३७ (३८. ९५ टक्के) |
| एकुण | | ४३ (४५.२६ टक्के ) | ५२ (५४.७४ टक्के ) | ९५ (१०० टक्के ) |

टेबल क्र. १ लिंगपरत्वे सहभागी विद्यार्थी प्रश्नावली प्रतिसाद दर्शवितो. एकुण ९५ विद्यार्थ्यांपैकी २७ (२८.४२ टक्के) हे बी.ए. सेमि. १ आणि २ चे विद्यार्थी आहेत. त्यापैकी १२ (४४.४४ टक्के) पुरूष तर १५ (५५.५५ टक्के) या स्त्री विद्यार्थी आहेत. ३१ (३२.६३ टक्के) हे बी.ए. सेमि. ३ आणि ४ चे विद्यार्थी असुन त्यापैकी १४ (३८.८८ टक्के) हे पुरूष विद्यार्थी आहेत, १७ (४७.२२ टक्के) या स्त्री विद्यार्थीनी आहेत. उरलेले ३७ (३८.९५ टक्के) हे बी.ए. सेमि. ५ आणि ६ चे विद्यार्थी असून त्यात १७ (४५.९४ टक्के) हे पुरूष आहेत तर ३७ (३८.९५ टक्के) हे स्त्री विद्यार्थी आहेत. यात विद्यार्थीनीची संख्या जास्त असलेली दिसून येते.

तक्ता क. २

इतिहास विषय शिकतांना यणारे अनुभव

| महाविद्यालय | सेमिस्टर | सकारात्मक | नकारात्मक |
|---|---|---|---|
| न. प. शिवाजी महा. मोवाड | बी.ए. सेमि. १ आणि २ N=२७ | १५ (५५.५५ टक्के) | १२ (४४.४४ टक्के) |
| | बी.ए. सेमि. ३ आणि ४ N=३१ | २७ (८७.०९ टक्के) | ४ (१२.९० टक्के) |
| | बी.ए. सेमि. ५ आणि ६ N=३७ | ३६ (९७.२९ टक्के ) | १ (२. ७० टक्के ) |
| एकुण (N=९५) | | ७८ (८२.१० टक्के ) | १७ (१७.८९ टक्के ) |

तक्ता क्र. २ हे दर्शवितो की,. एकुण ९५ विद्यार्थ्यांपैकी ७८ (८२.१० टक्के) विद्यार्थ्यांचे इतिहास विशय शिकतांना सकारात्मक अनुभव दिसून येते तर त्याखालोखाल १७ (१७.८९ टक्के) विद्यार्थ्यांना नकारात्मक अनुभव आले असे दिसून येते. याचाच अर्थ या १७ विद्यार्थ्यांना इतिहास विषय समजण्यात अडथळा निर्माण होत आहे.

### तक्ता क. ३
### इतिहास शिकवणी पध्दती

| महाविद्यालय | सेमिस्टर | लेक्चर पध्दती | इतिहासातील प्रसंगाचे कथा कथन | पीपीटी |
|---|---|---|---|---|
| न. प. शिवाजी महा. मोवाड | बी.ए. सेमि. १ आणि २ | १८ (६६.६६ टक्के ) | २० (७४.०७ टक्के ) | २४ (८८.८८ टक्के ) |
| | बी.ए. सेमि. ३ आणि ४ | २५ (८०.६४ टक्के ) | २९ (९३.५४ टक्के ) | ३० (९६.७७ टक्के ) |
| | बी.ए. सेमि. ५ आणि ६ | ३५ (९४.५९ टक्के ) | ३३ (८९.१८ टक्के ) | ३६ (९७.२९ टक्के ) |
| एकुण (N=९५) | | ७८ (८२. १० टक्के ) | ८२ (८६.३१ टक्के ) | ९० (९४.७४ टक्के ) |

तक्ता क्र. ३ असे दर्शवितो की,. एकुण ९५ विद्यार्थ्यापैकी ७८ (८२.१० टक्के) विद्यार्थ्यी लेक्चर पध्दतीचे समर्थन करतात त्याखालोखाल ८२ (८६.३१ टक्के) इतिहासातील प्रसंगाचे कथा कथन करून शिकविण्याच्या पध्दतीचे समर्थन करतात तर ९० (९४.७४ टक्के) विद्यार्थी हे पीपीटी व्दारा शिकविण्याच्या पध्दतीचे समर्थन करतात. यारून असे दिसुन येते की पीपीटी व्दारा शिकविण्याचे समर्थन करणारे विद्यार्थ्याची संख्या बाकीच्या तुलनेत सर्वात जास्त आहे.

### तक्ता क.४
### इतिहास विषयातील विद्यार्थ्याची आवड व जागृकता

| महाविद्यालय | सेमिस्टर | इतिहास विषय शिकणे आवडते | इतिहास विषय कंटाळवाणा वाटतो | इतिहास विषय समजण्यास कठिण आहे | इतिहास विषय स्पर्धा परिक्षेकरीता उपयुक्त |
|---|---|---|---|---|---|
| न. प. शिवाजी महा. शेवाड | बी.ए. सेमि. १ आणि २ छत्र२७ | २६ (९६.२९ टक्के ) | १२ (४४.४४ टक्के ) | १६ (५९.२५ टक्के ) | २४ (८८.८८ टक्के ) |
| | बी.ए. सेमि. ३ आणि ४ छत्र३१ | ३० (९६.७७ टक्के ) | १५ (४८.३८ टक्के ) | २० (६४.५१ टक्के ) | २९ (९३.५४ टक्के ) |
| | बी.ए. सेमि. ५ आणि ६ छत्र३७ | ३४ (९१.८९ टक्के ) | १३ (३५.१३ टक्के ) | २९ (७८.३७ टक्के ) | ३५ (९४.५९ टक्के ) |
| एकुण (N=९५) | | ९० (९४.७३ टक्के ) | ४० (४२.१० टक्के ) | ६५ (६८.४२ टक्के ) | ८८ (९२.६३ टक्के ) |

तक्ता क्र. ४ हे दर्शवितो की, ९० (९४.७३ टक्के) विद्यार्थी यांना इतिहास विषय शिकणे आवडते, तद्वतच ४० (४२.१० टक्के) विद्यार्थ्यांना इतिहास विषय कंटाळवाणा वाटतो, ६५ (६८.४२ टक्के) विद्यार्थ्यांना इतिहास विषय समजण्यास कठिण जातो तर ८८(९२.६३ टक्के) विद्यार्थ्यांना इतिहास विषय स्पर्धा परिक्षेकरीता उपयुक्त आहे असे वाटते.

### तक्ता क.५
### इतिहास विषयाचे विद्यार्थ्याच्या पुढील शैक्षणिक जिवनातील स्थान

| महाविद्यालय | सेमिस्टर | इतिहास विषयात एम.ए. प्रवेश | स्पर्धा परिक्षे करीता एच्छिक विषय म्हणुन निवड | इतिहास विषयात करीअर |
|---|---|---|---|---|
| न. प. शिवाजी महा. मोवाड | बी.ए. सेमि. १ आणि २ छत्र२७ | १५ (५५.५५ टक्के) | २ (७.४० टक्के ) | ३ ( ११.११ टक्के ) |
| | बी.ए. सेमि. ३ आणि ४ छत्र३१ | २५ (८०.६४ टक्के ) | १० (३२.२५ टक्के ) | ५ ( १६.१२ टक्के ) |
| | बी.ए. सेमि. ५ आणि ६ छत्र३७ | २२ (५९.४५ टक्के ) | ९ (२४.३२ टक्के ) | १० (२७.०२ टक्के ) |
| एकुण (छत्र९५) | | ६२ (६५.२६ टक्के ) | २१ (२२.१० टक्के ) | १८ (१८.९५ टक्के ) |

तक्ता क्र. ५ असे दर्शवितो की,. ६२ (६५. २६ टक्के) विद्यार्थीचे मत आहे की त्यांना भविष्यात इतिहास विषयात एम.ए. ला प्रवेश घ्यावयाचा आहे.

त्याखालोखाल २१(२२.१० टक्के) विद्यार्थ्यांना इतिहास विशय स्पर्धा परिक्षे करीता एच्छिक विषय म्हणुन निवडावे असे वाटते तर १८(१८.९५ टक्के) विद्यार्थ्यांना इतिहास विषयात करीअर करावयाचे आहे.

शोध

- इतिहास विषयाला स्त्री विद्यार्थीनींची संख्या ५२ (५४.७४ टक्के) पुरूष विद्यार्थी संख्या ४३ (४५. २६ टक्के) पेक्षा जास्त आहे.
- ७८ (८२.१० टक्के) विद्यार्थी यांना इतिहास विषय शिकताना सकारात्मक अनुभव आलेत.
- १७ (१७.८९ टक्के) विद्यार्थ्यांना इतिहास विषय समजण्यात कठिण जातो आहे.
- पीपीटी व्दारा शिकविण्याचे समर्थन करणारे विद्यार्थ्यांची ९० (९४.७४ टक्के) संख्या बाकीच्या तुलनेत सर्वात जास्त आहे.
- ९० (९४.७३ टक्के) विद्यार्थी यांना इतिहास विषय शिकणे आवडते
- ६२ (६५.२६ टक्के) विद्यार्थीचे मत आहे की त्यांना भविष्यात इतिहास विषयात एम.ए. ला प्रवेश घ्यावयाचा आहे. म्हणजेच इतिहास विषयात एम.ए. ला प्रवेश घेऊ इच्छिणारे अर्ध्यापेक्षा जास्त आहेत.

सुचना आणि निष्कर्श

इतिहास विषय समजणे आणि तो व्यवस्थित रित्या शिकविणे हे यशस्वी शिक्षकाचे लक्षण आहे. शिक्षकांनी या आधुनिक काळात पारंपारीक पध्दतीने शिकविण्याचे टाळावे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आवडेल आणि समजेल अश्या पध्दतीचा समावेश वर्गात इतिहास शिकवताना करायला पहीजे. इतिहास शिकविणे म्हणजे भुतकाळ व वर्तमान काळाचा योग्य ताळमेळ लावणे होय. ज्या विद्यार्थ्यांना इतिहास विषय अवघड वाटतो अश्या विद्यार्थ्यांना स्लो लर्नर समजून अधिक समजावून सांगावे जेणे करून त्यांना विषय समजणे सोपे जाईल. इतिहास विषय शिकविताना तो कथा स्वरूपात पीपीटी ने विद्यार्थ्यांना सांगीतला तर तो त्यांच्या लक्षात राहतो. तो प्रसंग डोळयासमोर आपोआप चित्रित होतो. त्यामुळे त्यांना समजणे सोपे जाते.

प्रस्तुत संशोधनातून असा निष्कर्श निघतो की, विद्यार्थ्यांना इतिहास विषयाचे पाहीजे तेवढे ज्ञान नसते. काही विद्यार्थ्यांना तो आवडतो तर काहींना कंटाळवाणा वाटतो. इतिहास विषयातील विद्यार्थ्यांना हा विषय आवडतो, समजतो. बरेचशे विद्यार्थी हे वेगळया शिकविण्याच्या पध्दतीचे समर्थन करतात. शिक्षकाने त्याप्रमाणे आपल्या शिकवण्याच्या पध्दतीमध्ये बदल करावयाला पाहीजे. जेणेकरून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना विषय समजणार. या संषोधनाचा महाविद्यालयाला, इतिहास विभागासंदर्भात विद्यार्थ्याचे काय मत आहे हे जाणून घेण्यास नक्कीच मदत हाईल.

संदर्भ

1- Julio Noboa (2013) Teaching history on the border: teachers voice their views, International Journal of Qualitative Studies in Education, 26:3, 324-345, https://www.tandfonline.com/action/showCitFormats?doi=10.1080%2F09518398.2012.762477 access on 21/04/2019

2- Bhoi Dhnyaneshwar and Lakra Neelima (2017).Social Science Curriculum Teaching and their Difficulties: Understanding Children's Participation from Different Social Background. National Seminar on Research in Social Science Education in Indian Schools. March 15-17, 2017. Departmnet of Education in Social Sciences. NCERT, New Delhi.

3- Fogo, B. (2014). Core practices for teaching history: The results of a Delphi panel survey. Theory & Research in Social Education, 42(2), 151-196. https://www.tandfonline.com/doi/abs/10.1080/00933104.2014.902781. access on 21/04/2019

4- Koutrouba, K (2012). A profile of the effective teacher: Greek secondary education teachers" perceptions. European Journal of Teacher Education, 35 (3), 359-374, https://www.tandfonline.com/doi/abs/10.1080/02619768.2011.654332 access on 21/04/2019

5- Yilmaz, K (2008). A vision of history teaching and learning: Thoughts on history education in secondary schools. The High School Journal, Vol. 92, No. 2 (Dec., 2008 - Jan., 2009) 37-46. https://eric.ed.gov/?id=EJ822316 access on 20/04/2019.